# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.12.2025** **वार- रविवार**

---

**निकाल**

पुणे जिल्ह्यातील 14 नगरपरिषदा आणि 3 नगरपंचायतींच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचं वर्चस्व स्पष्टपणे दिसून आलं. जिल्ह्यातील 17 पैकी 10 ठिकाणी नगराध्यक्षपद अजित पवार गटाकडं गेलं आहे. तर लोणावळा, दौंड, इंदापूर, जेजुरी, बारामती आणि फुरसुंगी या नगरपरिषदांमध्येही राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटानं सत्ता मिळवली आहे. तळेगाव आणि शिरूर इथं बहुमत भाजपाला असलं तरी नगराध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडं गेलं आहे. चाकण, जुन्नर आणि राजगुरुनगर इथं शिवसेना एकनाथ शिंदे गटाचा विजय झाला आहे. सासवड आणि आळंदी इथं भाजपानं सत्ता मिळवली असून भोर नगरपरिषदेत बहुमत भाजपाचं असलं तरी नगराध्यक्षपद राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडं गेलं आहे.

**शुभांशु**

'आकाश ही कधीच मर्यादा नव्हती आणि नसेल; माझ्यासाठी नाही, तुमच्यासाठी नाही आणि भारतासाठी तर मुळीच नाही!' अशा शब्दांत अंतराळवीर आणि भारतीय वायु दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी आज पुणे पुस्तक महोत्सवात युवा पुणेकरांना स्वप्नं सत्यात उतरविण्याचा सल्ला दिला. 'भारत २०४० मध्ये चंद्रावर उतरण्याची तयारी करत आहे. कदाचित तिथं पडणारं पहिलं पाऊल तुमचं असू शकतं.

सातत्यपूर्ण प्रयत्न, चिकाटी, निर्धार आणि कठोर परिश्रमातून हे स्वप्न सत्यात उतरवता येतं असं ते म्हणाले. शुभांशू शुक्ला यांनी पुणे पुस्तक महोत्सवाला भेट देऊन आपल्या अंतराळ मोहिमेचे रोमांचक अनुभव पुणेकरांसमोर मांडले. या महोत्सवाची आज सांगता होत आहे.

**<u>दिव्यांग</u>**

दिव्यांगाच्या कल्याणासाठी आठ दशकांहून अधिक काळ कार्यरत महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टीज कंपनीच्या प्रस्तावित विक्रीला स्थगिती देण्याची मागणी राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडं केली आहे. नवी दिल्ली इथं अर्थमंत्र्यांची भेट घेऊन कुलकर्णी यांनी या मागणीचं निवेदन दिलं आणि या निर्णयामुळं दिव्यांग व्यक्तींच्या कुटुंबांवर होणाऱ्या गंभीर मानवीय आणि सार्वजनिक परिणामांबाबत चर्चा केली. पालकांच्या निधनानंतर दिव्यांग अपत्यांच्या आर्थिक सुरक्षिततेचा ‘आजीवन संरक्षक’ म्हणून या संस्थेकडे पाहिलं जातं, असंही त्यांनी नमूद केलं.

**<u>विक्रेता</u>**

दलित उद्योजकांसाठी तसंच नवीन स्टार्ट अपसाठी आपल्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळावी आणि शासकीय विविध कंपन्यांना लागणारा कच्चा माल पुरवठा आणि त्याबाबत मार्गदर्शन मिळावं या उद्देशानं दलित उद्योजकांसाठी पुण्यात राज्यस्तरीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री आणि राष्ट्रीय अनुसूचित जाती–जमाती हब यांनी संयुक्तपणे त्याचं आयोजन केलं होतं. अनुसूचित जाती – जमाती आणि महिला उद्योजकांना व्यवसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी यात सहभागी झाले होते.

**<u>पालकर</u>**

आयुष्याच्या वाटेवर कुठं थांबायचं, कुठे बदल करायचे याविषयी माझ्या ठाम भूमिका असल्यामुळं आज मी जो आहे तो तृप्त आहे, अशी भावना ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांनी आज पुण्यात रोटरी मराठी

साहित्य संमेलनात बोलताना व्यक्त केली. माझ्या भूमिका रसिकांना आवडल्या याचं श्रेय माझ्या चित्रपटाच्या दिग्दर्शकांना द्यावं लागेल कारण त्यांनी माझं व्यक्तिमत्व फुलविण्याची संधी दिली असंही त्यांनी नमूद केलं.

**<u>डावे-उजवे</u>**

देशाच्या विकासाच्या वाटेवर समकालीन वाटचाल करताना समन्वयाची, विवेकवादी भूमिका आणि पूरक कृती महत्त्वाची असल्याची भूमिका रोटरी मराठी साहित्य संमेलनातील परिसंवादात व्यक्त झाली. डावे की उजवे - विचारांच्या चक्रव्यूहातील आम्ही या विषयावरील परिसंवाद आज श्रोते आणि वक्त्यांच्याही प्रतिसादानं रंगला. अविनाश धर्माधिकारी, अभिजीत जोग, अॅडवोकेट असीम सरोदे, डॉक्टर विश्वंभर चौधरी आणि लेखिका गीताली वि. म. यांनी परिसंवादात विचार मांडले. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखिका डॉक्टर अश्विनी धोंगडे होत्या

**<u>स्वच्छता</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक परिसर निर्माण करण्याच्या उद्देशानं आज सर्वसमावेशक स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आलं. विद्यापीठातील शैक्षणिक आणि प्रशासकीय इमारती, रस्ते, बागा तसंच सार्वजनिक जागांची स्वच्छता करण्यात आली.

**<u>भाज्या</u>**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आवक आणि मागणी वाढल्यानं बहुतांश फळभाज्यांचे भाव स्थिर आहे. मार्गशीर्ष आणि लग्नसराईचा हंगाम ओसरल्यानं फुल बाजारात मंदीचं वातावरण आहे. थंडीमुळं तोडणी कमी झाल्यानं बाजारात आवक घटली असून मागणीही नसल्यानं जवळपास सर्वच फुलांच्या भावात घसरण झाली आहे.

**प्रशिक्षण**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं पहिलं प्रशिक्षण काल पार पडलं. तीन टप्प्यात पार पडलेल्या या प्रशिक्षणात संगणकीय सादरीकरणाद्वारे प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आलं. प्रशिक्षणाच्या शेवटच्या सत्रात ईव्हीएम, बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट हाताळण्याबाबत सविस्तर प्रात्याक्षिक दाखविण्यात आलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**